
# मराठी विज्ञानसाहित्य

## स्वरुप, व्याप्ती व बदलते परिप्रेक्ष्य

- संपादक -

**डॉ. संजय शिंदे**



# मराठी विज्ञानसाहित्य

## स्वरुप, व्याप्ती व बदलते परिप्रेक्ष्य

संपादक

**डॉ. संजय शिंदे**

जिजामाता शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदूरबार

Prashant

प्रशांत पब्लिकेशन्स

मराठी विज्ञानसाहित्य : स्वरुप, व्याप्ती व बदलते परिप्रेक्ष्य

© सुरक्षित

■ प्रकाशक । मुद्रक

रंगराव पाटील
प्रशांत पब्लिकेशन्स
3, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ,
जळगाव 425001.

■ दूरध्वनी । वेब । ईमेल

0257-2235520,2232800
www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com

■ आवृत्ती । आयएसबीएन । किंमत

8 मे 2022
978-93-89493-95-5
₹ 450/-

■ अक्षरजुळवणी

प्रशांत पब्लिकेशन्स

*e -Books are available online at* www.prashantpublications.com
**Prashant Publications** *app for e-Books*
kopykitab.com • amazon.com • play.google.com

*या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुर्नप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक/प्रकाशक आणि संपादक यांची लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच या पुस्तकातील लेखातील मजकूराची संपूर्ण जबाबदारी ही सर्वस्वी लेखक/लेखकांची राहील. लेखकांनी मांडलेल्या सर्वच मतांशी संपादक/प्रकाशक सहमत असतील असे नाही.*

## : अनुक्रमणिका :


- स्वातंत्र्योत्तर भारतीय वैज्ञानिक प्रगती आणि विज्ञानसाहित्य ........... ११
  - डॉ. संजय ढोले
- वर्तमानावर भाष्य आणि भविष्याचा वेध घेणाऱ्या निवडक मराठी विज्ञान कादंबऱ्या .................................. २८
  डॉ. मोना चोमोटे
- आधुनिक साहित्य प्रवाह विज्ञान साहित्य.............................. ४६
  -दिलीप पवार
- विज्ञानकथा : समीक्षेचे निकष व उपयोजन .......................... ५१
  - डॉ. फुला बागूल
- स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी विज्ञान-काल्पनिका व विज्ञानकथांची वाटचाल............................................. ६७
  - जोसेफ तुस्कानो
- मराठीतील विज्ञानसाहित्य आणि बदलत्या सामाजिक जाणिवा ........ ७१
  - प्रा. चिन्मय मधू घैसास
- जागतिकीकरण आणि मराठी विज्ञानकथा ............................ ७८
  - डॉ.सचिन गंगाधर गिरी
- मराठी विज्ञान साहित्य : सांस्कृतिक परिप्रेक्ष्य ........................ ८३
  - डॉ.वंदना लव्हाळे
- संमोहनाबाबत श्याम मानव यांच्या वैज्ञानिक जाणीवा ................ ८९
  - प्रा. नारायण बाबुराव पाटील
- मराठी विज्ञानकथा : स्वरूप, विकास व वाटचाल..................... ९४
  - श्री.सुरेश साहेबराव मालचे, प्राचार्य डॉ. मोतीराम देशमुख
- विज्ञान कादंबरी स्त्रीदर्शन ............................................ ९९
  - देवरे कल्पना रखा
- विज्ञान साहित्यातील तिसऱ्या टप्प्यातील कथा : बीटा एकशे तेवीस एक विश्लेषण..................................१०९
  - युवराज पवार
- विज्ञानसाहित्य प्रवाहात डॉ. जयंत नारळीकरांचे योगदान..............११७
  - डॉ. संजय शिंदे

- **मराठी बालविज्ञान साहित्य निर्मितीची समस्या : एक दृष्टिक्षेप** .........१२५
  - प्रा. सागर रघुनाथ सुरवसे
- **विज्ञान साहित्य : आधुनिक प्रवाह** ....................................१३२
  - श्री.संदीप दौलत भदाणे
- **बदलती मराठी विज्ञान कादंबरी** ....................................१३८
  - महेश नारायण आवळे
- **मराठी विज्ञानकथा : स्त्रीजीवन दर्शन**....................................१४१
  - डॉ.हर्षदा पुराणिक
- **मराठी कवितेतील विज्ञानस्थळे**....................................१५०
  - जोसेफ तुस्कानो
- **डॉ. संजय ढोले यांची विज्ञानकथा**....................................१६०
  - संतोष नानाभाऊ पाटील
- **निरंजन घाटे ह्यांच्या विज्ञानकथांमधील आशयविश्व** .................१६८
  - डॉ. रवींद्र रामचंद्र शिंदे
- **विज्ञान साहित्याचे मराठी साहित्यातील योगदान : एक अभ्यास**.......१८४
  - प्रा.प्रतिभा भारत पैलवान
- **विप्लवा : विज्ञान साहित्यकृतीचा परामर्श**............................१९१
  - कु.वेदांग वसंत बेहेरे
- **अघटित – विज्ञान कादंबरी, एक आकलन** ...........................१९६
  - तन्वी महेश चाफाडकर
- **आकाशभाकिते – एक आकलन** .......................................२०१
  - कु. रोहिणी पुंडलिक नेवरेकर.
- **वामन परत न आला: एक आकलन** ..................................२०६
  - विशाका विलास पालकर
- **विज्ञान साहित्याचा आजवरचा प्रवास**..................................२१२
  - श्री चेतन रमेश पाटील
- **जोसेफ तुस्कानो यांच्याबाल विज्ञानकथा**..............................२१७
  - हर्षदा निंबा बोरसे
- **विज्ञान कादंबरी : स्त्री जीवन दर्शन**..................................२२५
  - सारिका मंगेश जोशी

- हिंदी साहित्यातील विज्ञान कथा व कादंबरी यांचा परामर्श ............२२९
  – प्रा. डॉ.युवराज वसंत पाटील
- मराठी विज्ञानसाहित्य – स्वरूप, व्याप्ती व बदलते परिप्रेक्ष्य...........२३७
  – श्री. जितेंद्र रामचंद्र नगराळे
- एकविसाव्या शतकातील विज्ञान साहित्य व स्त्री विज्ञान ...............२४०
  – सोनल किशोर काकुस्ते
- मृत्यूदूत – निरंजन घाटे ................................................२४३
  – आदिती वासुदेव नाईक
- शास्त्रीय संशोधन, संशोधनाचे प्रकार व पद्धती ..........................२४६
  – कैलास वसावे
- संशोधन व संशोधनाच्या विविध पद्धती...................................२५४
  – आशिष गुलाबसिंग वसावे, प्राचार्य डॉ. संजय एस. शिंदे
- संशोधन व संशोधनाच्या विविध पद्धती...................................२६४
  – दत्तात्रय गणपत शिंदे
- संशोधन व संशोधनाच्या विविध पद्धती...................................२७१
  – श्री. सुनील अंबादास आहिरे
- संशोधन व संशोधनाच्या विविध पद्धती...................................२७९
  – श्री.महेंद्र साहेबराव पाटील
- शास्त्रीय संशोधन प्रक्रियेतील वैज्ञानिक शब्दकोश.....................२८३
  – दिनेश दिलीप साळुंके
- वैज्ञानिक आणि सैद्धांतिक ज्ञान ........................................२८९
  – प्राचार्य, प्रमोद बोरसे
- पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचाराचे प्रमुख सूत्र – विज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोन ........................................२९५
  – मिनाक्षी भाऊराव गिरी
- वैज्ञानिक संशोधनाचा अर्थ, गरज आणि वैज्ञानिक पद्धतीचे टप्पे .....३०१
  – विजय मांगु ठाकरे, प्रा. डी. झेड चौधरी
- वैज्ञानिक पद्धतीची – वैशिष्ट्ये प्रमुख टप्पे व गरज ..................३०६
  – श्री. अनिल शिवाजी माळी
- वैज्ञानिक तत्वज्ञानाची तात्विक व ऐतिहासिक बाजू....................३११
  – श्री. सोनवणे प्रवीणराव मोतीलाल

- **संशोधनाची व्याख्या, वैज्ञानिक संशोधनाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये ...३१७**
  - श्री. सुरज वामन नगराळे
- **संशोधन व संशोधनाच्या विविध पद्धती ....................................३२२**
  - नागेश श्रीकृष्ण शिंगणे, प्रा. डॉ. किशोर सी. सोनवणे
- **वैज्ञानिक ज्ञानातील आगमन, निगमन आणि प्रात्यक्षिक पद्धती .......३२९**
  - काकुस्ते किशोर साहेबराव
- **वैज्ञानिक ज्ञानाची चार रूपे – तत्त्वे, नियम, सिद्धांत व माहिती .......३३४**
  - हेमकांत गुलाबराव अहिरराव

# मराठीतील विज्ञानसाहित्य आणि बदलत्या सामाजिक जाणिवा

– प्रा. चिन्मय मधू घैसास
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
गोवा विद्यापीठ

विसाव्या शतकाच्या आरंभी मराठी साहित्यविश्वात विज्ञानसाहित्य या नव्या प्रवाहाचा जन्म झाला आणि याच शतकाच्या अखेरच्या टप्प्यात हा प्रवाह आपले स्वतंत्र अस्तित्व घेऊन प्रस्थापित झाला. काळानुरूप मराठी विज्ञान साहित्य हे अधिकाधिक प्रगल्भ होत गेले आहे. एकाच ठराविक साच्यात न राहता हे साहित्य आज वेगवेगळ्या शाखांचा आणि क्षेत्रांचा विचार करताना आपल्याला दिसते. अंतराळ आणि खगोलविश्व यांच्या भोवती फिरणारे विज्ञानसाहित्य आज मानवी जीवन आणि त्याच्या सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक अशा विविध आयामांचा वेध घेताना दिसते. त्याचबरोबर हे विज्ञानसाहित्य मानवी भावभावना आणि मानवी मनाचा देखील ठाव घेण्याचा प्रयत्न करताना आपल्याला दिसते.

आरंभीच्या काळात विज्ञानविषयक केवळ माहिती देणे हाच निव्वळ उद्देश घेऊन मराठीतून विज्ञान लेखन केले गेलेले आपल्याला दिसते. परंतु नंतरच्या काळात विज्ञान विषयक जाणीव अधिक समृद्ध झाल्याने शास्त्रीय आणि माहितीवजा लेखनाच्या पलिकडील लेखनाची गरज जाणवू लागली. यातूनच मराठी विज्ञानसाहित्य जन्मास आले. वेगवेगळ्या वैज्ञानिक जाणीवा आणि वैज्ञानिक शोध यांच्याभोवती फिरणार्या ललित साहित्यकृतींच्या माध्यमातून वाचकांना विज्ञानाची गोडी लागावी तसेच त्यांच्या मनात विज्ञानाविषयीचे विचार निर्माण व्हावेत असाच हेतू त्यामागे होता. विज्ञानसाहित्य या संदर्भात निरंजन घाटे यांनी मांडलेल्या व्यवच्छेदक निकषांचा विचार करता, विज्ञान साहित्य हे सद्यस्थितीला डोळ्यांसमोर ठेऊन भविष्यकाळाचा वेध घेण्याचा प्रयत्न करत असते.

आज मानवी जीवन ज्या स्तरावर आहे त्या तुलनेने आगामी काळात, नजीकच्या वा दूरच्या भविष्यात ते कुठे पोचलेले असेल याचा विचार विज्ञानसाहित्य प्रामुख्याने करते. समाजाची विज्ञानाविषयीची जी जाणीव वाढीस लागली त्यातून विज्ञानसाहित्य लेखनासाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली. जयंत नारळीकरांसारख्या विज्ञानलेखकांमुळे मराठीत विज्ञानसाहित्य हा नवा साहित्यप्रवाह प्रस्थापित होण्यास मदत झाली. मराठीतील विज्ञानसाहित्य आजही फार मोठ्या प्रमाणात अंतराळ, पृथ्वीबाहेरील जीवसृष्टी यासारख्या विषयांभोवतीच फिरताना आपल्याला दिसून

येते. कालानुरूप यामध्ये वेगवेगळ्या नवनवीन क्षेत्रांचा समावेश झालेला दिसतो परंतु एकंदरीतच पृथ्वीबाहेरील जीवसृष्टी व पृथ्वीबाहेरील, खगोलीय अस्तित्व याचेच अप्रूप विज्ञानसाहित्याला आजही आहे.

विज्ञान साहित्याच्या वाढत्या प्रचार आणि प्रसारामुळे आज समाजाच्या अनेक जाणिवा फार मोठ्या प्रमाणात क्रांतिकारकपणे बदलताना आपल्याला दिसून येत आहेत. विज्ञानसाहित्यामुळे मानवाला स्वत:च्या अस्तित्वाचा प्रश्न नव्याने भेडसावू लागलेला आहे. आपण नेमके कोण आहोत? आपण कुठून आलो आहोत? आपल्या या जीवनाचे नेमके उद्दिष्ट तरी काय? अशा वेगवेगळ्या प्रश्नांचा सामना करण्याचा विज्ञानसाहित्याच्या मदतीने प्रयत्न माणूस करू लागला आहे. यातच परग्रहवासी मुद्द्याच्या संदर्भात अनेक संशोधकांनी केलेली मतमतांतरे फार महत्त्वाची ठरतात.

विज्ञानसाहित्यामुळे देव-धर्म यासारख्या गोष्टींची पुन्हा नव्याने चर्चा व्हायला सुरुवात झालेली आहे. मुळात आपण ज्याला देव मानतो ते देव होते का ते कुणी परग्रहवासी होते असाही प्रश्न अनेक संशोधक उपस्थित करू लागले आहेत. देव म्हणताक्षणी आपण सर्वजण आकाशाकडेच का पाहतो? असा प्रश्न एरिक वॉन डेनिकन सारखे विचारवंत, संशोधक उपस्थित करतात. पृथ्वीवर वेगवेगळ्या ठिकाणी सापडणारे रहस्यमयी अवशेष, विविध प्रकारची बांधकामे, वास्तु, पुरातन मुर्त्या यासारखे तपशील देऊन त्यांनी या मुद्द्यावर विवेचन केलेले आहे. आपल्याकडील देवदेवतांचे संदर्भ आपण पाहिले तर ते आपल्याला अनैसर्गिक अशा स्वरूपाचे दिसून येतात असे या संशोधकांचे मत आहे. हे त्यांचे मत फार कोठ्या प्रमाणात पटण्यासारखेही आहे. ज्यांची वर्णने आपल्याला वाचायला, ऐकायला मिळतात ते सजीव म्हणजे माणूस आणि प्राणी यांच्या संकरातून निर्माण झालेले असल्याचे भासते. याचा अर्थ, पारलौकीक शक्ती असलेल्या ज्या सजीवांना आपण आजवर देव मानत आलो आहोत ते मुळात कोणी परग्रहवासी होते का? अशा पद्धतीचा नवा विचार यानिमित्ताने पुढे येऊ लागला आहे.

अनंत अशा या ब्रह्मांडामध्ये आपल्यासारखे आपणच आहोत असे मानणे खूपच चुकीचे आणि मुर्खपणाचे ठरेल अशीही धारणा या संशोधकांची आहे. आपल्यापेक्षा फार प्रगत अशा प्रकारचे जीव ब्रम्हांडाच्या कोणत्या तरी दुसऱ्या भागातून पृथ्वीवर कायम येत होते आणि त्याचे भौतिक पुरावे देखील आपल्याला पृथ्वीवर आढळतात असेही मत यांनी व्यक्त केलेले आहे. मराठीतील विज्ञान साहित्यामध्ये देखील अशा तऱ्हेच्या परग्रहवासींसंदर्भात तसेच परग्रहावरील मानवी वास्तव्य याविषयीच्या अनेक कल्पना लेखकांनी मांडलेल्या आहेत. पृथ्वीबाहेरील जीवन, परग्रहवासी,

त्यांच्याविषयीच्या अद्भुत आणि चमत्कारिक कल्पना असे अनेक मुद्दे मराठी विज्ञान साहित्यामध्ये वारंवार आलेले आपल्याला पाहायला मिळतात. या साहित्यकृतींमध्ये परग्रहवासींना मानवसदृश्य दाखवण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यांच्या शारीरिक आणि मानसिक अवस्थेचे वर्णन माणसासारखेच केलेलेर आपल्याला दिसून येते. परंतु नव्या जाणीवेप्रमाणे विचार करता, भविष्यकाळामध्ये यदा-कदाचीत असे काही परग्रहवासी मानवाच्या समोर प्रत्यक्षात उभे ठाकले तर ते कसे असतील? ते कसे दिसतील? असे वेगवेगळे प्रश्न वाचकांना पडू लागले आहेत.

मराठीतील विज्ञान साहित्याने वेगवेगळ्या प्रकारच्या कथा आणि कादंबऱ्यांतून पृथ्वीवरील समाजजीवन, मानवी भावना, विचार, प्रवृत्ती यांचे दर्शन आपल्याला घडवले आहे. विज्ञानाच्या वेगवेगळ्या शोधांचा मानवी जीवनावर होणारा प्रभाव आणि भविष्यातील संभाव्य धोके यांचाही विचार विज्ञान साहित्य करते. एकूणच विज्ञानाचा अतिरेक झाला तर त्यामुळे माणसाच्या जीवनाची मूल्यव्यवस्था संपुष्टात येईल की काय अशा तऱ्हेची भीती देखील वेगवेगळ्या विज्ञान कथा लेखकांनी मांडलेली दिसून येते.

विज्ञान साहित्य म्हणजे केवळ भविष्याकडे पाहणे नव्हे तर आपल्या भूतकाळाकडे देखील त्याच वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे हे विज्ञान साहित्याचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. मिथके किंवा दंतकथा यांच्या अंगाने आजवर जे संदर्भ आपण पाहत आलो आहोत त्यांचा काही वैज्ञानिक दृष्टिकोन असू शकतो का याचाही विचार नव्या जाणिवांमध्ये समाविष्ट होतो. परग्रहवासी सिद्धांत (Ancient Alien Theory) मांडणार्यांनी दोन सिद्धांत समोर ठेवले आहेत. पहिला म्हणजे झू (प्राणीसंग्रहालय) सिद्धांत आणि दुसरा म्हणजे जंगल सिद्धांत. एखाद्या प्राण्याला संग्रहालयात बंदिस्त करून त्याच्यावर दुरून जशी नजर ठेवली जाते त्याचप्रमाणे पृथ्वीवर देखील कुणीतरी सतत लक्ष ठेवून आहे असे त्यांचे मानणे आहे. पृथ्वीपासून लाखो किलोमिटर दूर असलेला चंद्र हा जणू त्याकामी एका सीसीटीव्हीचे काम करतोय असाही दावा हे संशोधक करतात. चंद्रामुळे पृथ्वीवर भरती-ओहोटी येणे ज्याप्रमाणे घडते त्यावरून त्यांचा हा दावा निश्चित विचार करण्यासारखा ठरतो.

रामायण-महाभारत यासारख्या जुन्या ग्रंथातील अनेक तथ्यांकडे आज नव्याने पाहण्याची समाजाची दृष्टी तयार होऊ लागली आहे. रामायणात येणारा विमानाचा उल्लेख आपल्याला अचंभित करतो. जे तंत्रज्ञान त्या काळात अस्तित्वातच नव्हते त्याचा उल्लेख त्या वर्णनात आला कसा? याचा विचार आज व्हायला लागला आहे. महाभारतात संजयाने धृतराष्ट्राला दिव्य दृष्टीने युद्धभूमीवरील घटनेचे वर्णन सांगणे हा उल्लेख वाचताच, त्या काळात कॅमेरा, उपग्रह प्रक्षेपण, टीव्ही यासारख्या

गोष्टी अस्तित्त्वात होत्या की काय असाच प्रश्न पडतो. आणि जर का या सर्व गोष्टी त्या काळात खरोखरीच अस्तित्वात होत्या असे आपण गृहित धरले तर मग या गोष्टी तत्कालीन मानवाजवळ कुठून आल्या असा दुसरा प्रश्न पुढे येतो. या आणि अशा कितीतरी महत्त्वाच्या संदर्भांचा पुनर्विचार विज्ञानसाहित्यामुळे आज पुढे येऊ लागला आहे.

विज्ञानसाहित्याच्या दृष्टीने, भूतकाळाच्या या फेरविचाराबरोबरच मानवी जीवनाच्या भविष्याचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. आजवर मानवाने केलेल्या वैज्ञानिक प्रगतीचा आलेख पाहता आगामी काळात माणूस किती प्रगती करेल आणि त्यावेळी मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या आयामांची काय स्थितीगती असेल याचा विचार आणि त्याविषयीची सामाजिक जाणीव महत्त्वाची ठरते. विज्ञानसाहित्य ज्या विविध शक्यतांची आणि संभावनांची चर्चा करते त्या गोष्टी खरोखरीच अस्तित्वात आल्या तर काय होईल ही नवी जाणीव आज पुढे येऊ लागली आहे. आज आपण सर्वजण स्वत:ला 'माणूस' म्हणवून घेतो. असे नामाभिधान आपण स्वत:ला देण्याचे कारण म्हणजे आपल्यासारखे दुसरे कुणीही आपल्याला सापडलेले नाही. परंतु, यदाकदाचित एखाद्या परग्रहावरील आपल्यासारख्याच जीवांचा परिचय आपल्याला झाला तर मग आपण स्वत:ला आणि त्यांना काय म्हणायचे? असा प्रश्न निर्माण होईल. आज पृथ्वीवर जगत असताना आपण स्वत:ला विशिष्ट एखाद्या देशाचे, प्रदेशाचे नागरिक म्हणवतो परंतु नजिकच्या काळात जर मानवाने पृथ्वीबाहेर वेगवेगल्या ग्रहांवर आपले अस्तित्व उभारले तर तेव्हाही आपण आपली हीच ओळख सांगणार आहोत की आपली ओळख नुसती 'पृथ्वीवासी' ही असेल? असाही प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीत आपल्या देशादेशांच्या भिंती आणि भेद गळून पडतील का ते तसेच राहतील? याही प्रश्नाचा जाणीवपूर्वक विचार विज्ञानसाहित्य आपल्याला करायला भाग पाडते.

परग्रहवासी या घटकाचा विचार करता, अनेक साहित्यकृतींतून त्यांचा पृथ्वीवर होणारा हल्ला या गोष्टीची चर्चा झालेली दिसते. भविष्यात असा हल्ला झालाच तर त्या हल्ल्याचा प्रतिकार करण्याचा निर्णय, त्याचे नेतृत्त्व कोण करणार याचाही विचार करायला हे विज्ञानसाहित्य आपल्याला भाग पाडते. असा हल्ला एकत्रितपणे परतवून लावण्यासाठी एखादे वेळेस संपूर्ण जग एकवटलेच तर त्याचा परिणाम म्हणून आपल्यातल्या सीमांच्या भिंती कायमच्या मोडून पडतील की ती आपल्या-आपल्यात एक तात्पुरती तडजोड असेल? हाही विचार इथे पुढे येतो.

भविष्य काळातल्या मानवी जीवनातील नैतिकता, मूल्ये, तत्वे यांचा उहापोह मराठी विज्ञानसाहित्यात होताना दिसतो. मानवी जीवन आज अधिकाधिक प्रमाणात

संगणक, यंत्रमानव आणि इतर उपकरणांच्या मदतीने चालताना आपण पाहतो. भविष्यात याचा फार मोठा अतिरेक होऊन माणूस यंत्राच्या आधीन जाईल की काय? हा मुद्दा विचारार्ह ठरतो. 'यंत्रसेवक' आणि 'यंत्रसेविका' असे दोन स्वतंत्र, भिन्नलिंगी उल्लेख करणारे शब्द अनेक विज्ञान कथांतून आपल्याला वाचायला मिळतात. मुळात, एखाद्या यंत्राचा उल्लेख विशिष्ट लिंगवाचक शब्दाने करण्याची गरज का? असा प्रश्न इथे उपस्थित होतो. भविष्यात मानवाजवळ जे यंत्रमानव असतील ते एवढे प्रगत असतील की ते कोणतेही काम करण्यास सक्षम असतील असे चित्र बहुतेक विज्ञान-कथांतून रंगवलेले दिसते. असे जर प्रत्यक्षात घडू लागले तर आपल्या शारीरिक, मानसिक, लैंगिक अशा सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी भविष्यातील मानव यंत्रांचाच वापर करेल का? असाही एक विचार या निमित्ताने चर्चेला घ्यावा लागेल.

पृथ्वीवरील विविध समस्यांवरील उपाय म्हणून कडक निर्बंध लादल्यास त्यातून निर्माण होणारे विविध प्रश्न, पृथ्वी आणि परग्रह यांचा वाढता सहसबंध, माणूस आणि यंत्र यांची सर्वार्थाने वाढती जवळीक, मानवाची प्रतिष्ठा, मानवी मनाची अनाकलनीयता, यंत्रांना स्वत:ची बुद्धी आणि मन असणे, परग्रहावर माणसाने आपले वास्तव्य केल्याने पृथ्वीकडे बघण्याचा बदललेला दृष्टीकोन, जागतिक स्तरावर असलेल्या सैन्यदळांप्रमाणेच 'ब्राह्मांडिक' स्तरावरील सैन्यदळाची स्थापना असे विविध मुद्दे विज्ञानकथांत दिसून येतात. यातील काही किंवा सर्वच मुद्दे अस्तित्त्वात आले तर मानवी जीवनाची चौकटच बदलेल का? अशीही बदलती जाणीव निर्माण होऊ लागली आहे. एखाद्या मागासलेल्या राष्ट्रातून एखादी व्यक्ती जेव्हा प्रगत प्रदेशात जाऊन स्वत:चा उत्कर्ष साधते त्याचप्रमाणे आपल्या भौतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक उत्कर्षासाठी माणूस भविष्यात पृथ्वी सोडून बाह्य ग्रहांवर जाऊ लागेल का? हा प्रश्न एक नवी जाणीव घेऊन येतो. असे घडल्यास, त्या नव्या जगाच्या तुलनेने संपूर्ण पृथ्वीच तथाकथित 'मागासलेली' ठरेल का? ही एक भयाण जाणीव विचार करायला भाग पाडते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पृथ्वी सोडून जरी माणूस बाह्य विश्वात गेला तरी तो आपल्यासोबत इथले सर्व गूण, विचार घेऊनच जाणार का? असाही मुद्दा उपस्थित होतो.

मराठी विज्ञानकथेत उल्लेख केल्याप्रमाणे नजिकच्या भविष्यात जर माणूस इतर ग्रहांवर वास्तव्य करू लागला तर मानवाच्या त्या नव्या परिप्रेक्ष्यात स्थळ, काळ, दिशा यांचे सर्व संदर्भच मुळासकट बदलून जातील का? अशी जाणीव निर्माण होते. आज वेळ, काळ यांचा जो विचार आपण करतो किंवा जी व्यवस्था आपण पृथ्वीवर आपल्यासाठी निर्माण केली आहे तिचा तोच संदर्भ अन्य ग्रहांवर

उरेल का? असा प्रश्न निर्माण होतो. माणूस आणि परग्रहवासी यांचा एकमेकांशी जर यदाकदाचित परिचय झालाच आणि दोन्हीही घटकांनी एकोप्याने आणि मिळून मिसळून राहण्याचे ठरवले तर त्याचा मानवी अस्तित्त्वावर काय परिणाम होईल? हा विचार नव्या खळबळजनक जाणीवेला जन्म देणारा आहे. पृथ्वीवर विविध संस्कृतींच्या सरमिसळीतून जी विविधता निर्माण झाली त्यापेक्षा वेगळे असे काहीतरी माणूस-परग्रहवासी यांच्या संकरातून निर्माण होईल का? ही देखील नवी जाणीव निर्माण होते.

मानवाच्या सध्याच्या वेगवेगळ्या जाणीवा, तत्वे, विचार हे पृथ्वीपुरतेच मर्यादित आहेत, किंबहुना त्यांचा संदर्भ पृथ्वीच्या परिप्रेक्ष्यातच आपण घेतो असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. परंतु, ज्या वेळी माणूस बाह्य ग्रहांवर पोचेल त्यावेळी त्या तत्वांचे काय होईल? माणूस तीच तत्वे सार्वत्रिकपणे समान पद्धतीने लागू करेल की स्वतंत्र ग्रहांवर स्वतंत्र आणि सार्वभौम अशी व्यवस्था निर्माण व्हायला लागेल? असाही प्रश्न पुढे येतो. मानवाने आजवर तयार केलेले असे नियम, नैतिकता, सिद्धांत यांची अशा परिस्थितीत पुनर्बांधणी होईल का? आंतरग्रहीय अशी काही तत्वे उदयास येतील का? असे कित्येक प्रश्न या निमित्ताने निर्माण होतात.

दुसऱ्या बाजूला, मानवाचे अस्तित्व पृथ्वीवरच कायम राहिले परंतु त्याच्या जगण्यातील यांत्रिकता पराकोटीला गेली तर त्याचे काय परिणाम होतील याचाही विचार करायला विज्ञानसाहित्य आपल्याला भाग पाडते. जैव-अभियांत्रिकी, रोबोटीक, जैविक अशा क्रांतीकारी शोधांमुळे मानवी जीवन आमुलाग्र बदलून जाईल अशी कल्पना विज्ञानसाहित्यिक करतात. ही कल्पना जर वास्तवात उतरली तर काय होईल? ही जाणीव चिंतनशील, संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारी आहे. आयुष्याचा जोडीदार म्हणून हवा तसा यंत्रमानव तयार करून घेणे, शरीराचा त्याग करून केवळ मेंदू-रूपाने जिवंत राहणे, असाध्य रोगांवरील उपाय सापडेपर्यंत स्वत:ला वर्षानुवर्षे एका शीतपेटीत मृतवत बंदिस्त करून ठेवणे, मानवी जीवनात तंत्रज्ञानाचा वाढता वापर अशा अनेक मुद्द्यांचा उहापोह विज्ञान-साहित्यात झालेला दिसतो. हे सर्व खरोखरीच अस्तित्वात आले तर मानवाच्या व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक अस्तित्वाची घडीच विस्कटून जाईल का? अशी दाट शंका आल्याशिवाय राहत नाही. हीच विज्ञानसाहित्याने समाजाला दिलेली वेगळी जाणीव आहे.

विज्ञानसाहित्यात वर्णन केलेल्या गोष्टी, कल्पना खरोखरीच अस्तित्वात येतील का नाही याची खात्री कुणीच देऊ शकत नाही. परंतु, यदाकदाचित तशी परिस्थिती आपल्यासमोर आलीच तर त्याला आपली प्रतिक्रिया काय असेल याचा किमान

विचार आपण करू शकतो. किंबहुना, असा विचार करता येणे आणि त्यासाठी मानवाला उद्युक्त करणे हे महत्त्वाचे कार्य विज्ञान साहित्य करताना आपल्याला दिसते. विज्ञानसाहित्यातील वर्णन हे काल्पनिक असले तरी ते सद्यस्थितीतील वास्तवाला धरून कल्पिलेले असते. त्यामुळे भविष्यकाळ आपल्यासाठी काय घेऊन येईल याची जरी शाश्वती आपण देऊ शकलो नाही तरी त्याचा विचार करून आवश्यक ती वैचारिक निश्चिती आपण निश्चित करू शकतो. समाजाच्या पारंपरिक जाणीवांत नवे बदल घडवून आणण्याचे विज्ञानसाहित्याचे कार्य निश्चितच महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:**


१. घाटे निरंजन, विज्ञानवाङ्मय (लेख), मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड ७ - भाग १, महाराष्ट्र साहित्य परिषद

२. डॉ. व. दि. कुलकर्णी, निरंजन घाटे (संपा.), विज्ञान साहित्य आणि संकल्पना, नीहारा प्रकाशन, प्रथमावृत्ती-ऑक्टोबर १९९०

३. पगारे, म. सु., मराठी विज्ञान साहित्य, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती-२००४

४. घाटे, निरंजन, मराठीतील निवडक कथा (संपा.) (प्रस्तावना), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती-२००१

५. कदम, दीपा, मराठी विज्ञानकादंबरी : एक वाङ्मयीन अभ्यास, (पी.एच.डी. प्रबंध), गोवा विद्यापीठ, २०१३

६. डॉ. शरणकुमार लिंबाळे, साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह (संपादन), दिलिपराज प्रकाशन, २००७

७. प्रा. चिन्मय मधू घैसास, जयंत नारळीकर : व्यक्ती आणि वाङ्मय, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक ३७३ (जानेवारी-मार्च २०२१)

८. प्रा. चिन्मय मधू घैसास, २१ व्या शतकातील भारतीय विज्ञान-मालिका आणि विज्ञान-चित्रपट, पंचधारा (विज्ञान-साहित्य विशेषांक), वर्ष ६३, अंक चौथा (जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२१)

९. Erich Von Daniken, Chariots of the Gods, 1968

१०. Erich Von Daniken, Gods From Outer Space

११. Ancient Aliens (Documentary Series), Fox History Channel




## प्राचार्य डॉ. संजय शिंदे

एम.ए., एम.एड., पीएच.डी.(शिक्षणशास्त्र)
योगशिक्षक, एम.ए., पीएच.डी.(मराठी)
डी.एस.एम. सीपीसीटी.,
एम.ए.(संप्रेषण), एम.ए.(योगा)
प्राचार्य, जिजामाता शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार


- अध्यापन अनुभव : २५ वर्ष.
- प्रकाशित ग्रंथ : ७.
- ४५ शोधनिबंध, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध.
- ५० राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्र कार्यशाळेत सहभाग.
- पीच.डी. मार्गदर्शक : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
- पीच.डी. मार्गदर्शक : जे.जे.टी.यु. विद्यापीठ, राजस्थान.
- मार्गदर्शक व समंत्रक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- विशेष पुरस्कार : उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार रौप्यमहोत्सवी चर्चासत्र वर्ष २००५.
- राष्ट्रीय पुरस्कार : 'प्राइड ऑफ नेशन' हैदराबाद मे २००६.
- राज्यस्तरीय : आदर्श शिक्षक पुरस्कार, नाशिक २००५.
- अभ्यास मंडळ सदस्य : शिक्षणशास्त्र विद्याशाखा क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
- केंद्रप्रमुख व मार्गदर्शक : एम.ए. एज्युकेशन : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- योगशिक्षक : सेंट मदर टेरेसा योग विद्याधाम, नंदुरबार.


मराठी साहित्य ₹ 450

Prashant

ISBN 978-93-89493-95-5

9 789389 493955

Also Available in e-Book

www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com